प्रसिध्दीसाठी

झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग

<u>पिंपरी, १४ ऑक्टोबर २०२२</u> :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेतील आर्थिक दुर्बल घटकांसाठी दि. २७ फेब्रुवारी २०२१ रोजी रावेत येथे ९३४, बोऱ्हाडेवाडी येथे १२८८, चऱ्होली येथे १४४२ असे एकुण ३६६४ यांची संगणक सोडतीद्वारे विजेता यादी जाहीर केली होती.

सदर योजनेतील **बोऱ्हाडेवाडी व चऱ्होली** येथील प्रकल्पातील निवड झालेल्या लाभार्थ्यांना कागदपत्रे पडताळणीपुर्ण झालेली असुन निवड झालेल्या लाभार्थ्यांना **मा.आयुक्त सो. श्री. शेखर सिंह, पिंपरी चिंचवड महानगरपालिका** यांच्या आदेशान्वये **विजेता यादीतील लाभार्थ्यांना १० % स्वहिस्सा भरणेस अंतिम मुदत** दि.३१/१०/२०२२ रोजी पर्यंत दिली असुन दिलेल्या मुदतीत स्वहिस्सा भरण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे.

तरी मुदतीत स्वहिस्सा न भरल्यास सदर लाभार्थ्यांचा लाभ रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(सुषमा शिंदे)
सक्षम प्राधिकारी
तथा
सहाय्यक आयुक्त
झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८